# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः21.02.2025** **वारःशुक्रवार**

---

1) पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते आज दिल्लीत 98व्या मराठी अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचं उद्‌घाटन

2) नवी दिल्लीत आयोजित सोल लीडरशिप कॉन्क्लेव्हचंही आज पंतप्रधान करणार उद्‌घाटन

3) पश्चिम आशियाई प्रदेशातील शांतता आणि स्थैर्य संपूर्ण जगासाठी आवश्यक असल्याचं परराष्ट्र व्यवहार मंत्री डॉक्टर एस.जयशंकर यांचं प्रतिपादन

4)अमेरिकेच्या FBI च्या संचालकपदी मूळ भारतीय वंशाचे काश पटेल यांची नियुक्ती.

आणि

5) चॅम्पियन्स करंडक क्रिकेट स्पर्धेत बांगलादेशवर 6 गडी राखून मात करत भारताची विजयी सलामी

आता सविस्तर बातम्या

**<u>साहित्यसंमेलन</u>**

अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाचं सरहद संस्था आयोजित ९८वं अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन आजपासून दिल्लीत सुरू होत आहे. ज्येष्ठ लेखिका डॉक्टर तारा भवाळकर यांच्या अध्यक्षतेखाली होत असलेल्या या संमेलनाचं उद्‌घाटन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते होणार आहे. दिल्लीतल्या तालकटोरा स्टेडियममध्ये उभारलेल्या छत्रपती शिवाजी महराज साहित्यनगरीत आजपासून तीन दिवस माय मराठीचा हा जागर होणार आहे.

अनेक वर्षांनी दिल्लीत रंगणाऱ्या या संमेलनासाठी राज्य सरकारनं एकंदर चार कोटी रुपये निधी देण्याचा निर्णय घेतला आहे. संमेलनाचा वाढलेला खर्च, संमेलनाचं वेगळेपण यासारख्या कारणांमुळे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या संमेलनासाठी अतिरीक्त २ कोटी रुपये द्यायला विशेष बाब म्हणून मंजुरी दिली आहे. दरम्यान, या साहित्य संमेलनासाठी पुण्याहून बुधवारी निघालेली महादजी शिंदे विशेष रेल्वे काल रात्री दिल्लीत पोहोचली. संमेलनात आज सुरुवातीला डॉ.बाबासाहेब आंबेडकर सभामंडप इथं ग्रंथ दिंडी आणि ध्वजारोहण होणार आहे. उद्‌घाटन समारंभ विज्ञान भवनात होणार असून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याबरोबरच स्वागताध्यक्ष ज्येष्ठ नेते शरद पवार, महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि संमेलनाध्यक्ष डॉ. तारा भवाळकर या सोहळ्याला उपस्थित असतील. उद्‌घाटनाच्या दुसऱ्या सत्रामध्ये संध्याकाळी होणाऱ्या कार्यक्रमात डॉ. तारा भवाळकर यांच अध्यक्षीय भाषण होईल. आजच संध्याकाळी

निमंत्रीतांचं कवीसंमेलन रंगणार आहे. या संमेलनासाठी मराठी साहित्य रसिक मोठ्या संख्येनं दिल्लीमध्ये दाखल झाले आहेत.

**<u>पीएमकॉन्क्लेव</u>**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते आज नवी दिल्लीतल्या भारत मंडपम मध्ये सोल लीडरशिप कॉन्क्लेव्हचं उद्घाटन होणार आहे. यावेळी भूतानचे पंतप्रधान दासो शेरिंग तोबगे प्रमुख पाहुणे म्हणून भाषण करतील. दोन दिवसांच्या या संमेलनात राजकारण, क्रीडा, कला आणि प्रसारमाध्यमे, अध्यात्म, सार्वजनिक धोरण, व्यापार आणि सामाजिक अशा विविध क्षेत्रांतील नेते त्यांच्या प्रेरणादायी प्रवासाबाबत आणि यशाबाबत माहिती देतील. हे संमेलन सहकार्य आणि विचार नेतृत्वाला चालना देणारं असून, युवकांना अपयश आणि यश या दोन्हीमधून शिकण्यासाठी प्रेरक ठरेल. गुजरातमधील स्कूल ऑफ अल्टिमेट लीडरशिप या अग्रणी नेतृत्व संस्थेच्या पुढाकारानं हे संमेलन होत आहे.
समाजाच्या कल्याणासाठी काम करणारं सक्षम प्रामाणिक नेतृत्व तयार करण्याच्या उद्देशानं या संस्थेची स्थापना करण्यात आली आहे.

**<u>पंतप्रधान रालोआ मुख्यमंत्री बैठक</u>**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काल नवी दिल्लीत, राष्ट्रीय लोकशाही आघाडीप्रणीत सरकारच्या मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांची बैठक घेतली. या बैठकीला केंद्रीय मंत्री अमित शहा, राजनाथ सिंह आणि जेपी नड्डा उपस्थित होते. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांच्यासह आंध्र प्रदेश, ओडिशा, मध्य प्रदेश, राजस्थान, दिल्ली आणि बिहारचे मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री उपस्थित होते.

**<u>दिल्लीसरकार</u>**

दिल्ली सरकारनं आयुष्मान भारत आरोग्य विमा योजना लागू करण्याचा निर्णय घेतला आहे. दिल्लीच्या नवनिर्वाचित मुख्यमंत्री रेखा गुप्ता यांनी काल संध्याकाळी पहिल्या कॅबिनेट बैठकीनंतर माध्यमांशी बोलताना ही माहिती दिली. दिल्ली सरकारनं आयुष्मान भारत योजनेसह पाच लाख रुपयांच्या निधीला एकमतानं मंजुरी दिली असून ती लवकरच लागू करण्यात येईल, असं ही गुप्ता यांनी यावेळी सांगितलं. विधानसभेच्या पहिल्या बैठकीत नियंत्रक आणि महालेखा परीक्षक अर्थात कॅगचे १४ अहवाल मांडले जातील अशी माहिती त्यांनी दिली. तत्पूर्वी भाजपाच्या रेखा गुप्ता यांनी काल दिल्लीच्या मुख्यमंत्रीपदाची शपथ घेतली. या सरकारमध्ये सामान्य प्रशासन, सेवा, वित्त, महसूल, महिला आणि बालविकास, आणि इतर खात्यांची जबाबदारी त्यांच्याकडे असेल.

**<u>परराष्ट्र मंत्री जयशंकर</u>**

सध्याची जागतिक भू-राजकीय परिस्थिती कठीण असून पश्चिम आशियाई प्रदेशातील शांतता आणि स्थैर्य संपूर्ण जगासाठी आवश्यक आहे,असं मत परराष्ट्र व्यवहार मंत्री डॉकटर एस.जयशंकर यांनी व्यक्त केलं.ते

काल दक्षिण आफ्रिकेतील जोहान्सबर्गमध्ये  जी वीस (G20) परिषदेच्या  परराष्ट्र मंत्र्यांच्या बैठकीत बोलत होते.

मतभेदाचं रूपांतर वाद आणि संघर्षात होऊ नये,तसंच  संघर्षामुळे मोठे नुकसान होता कामा नये असंही जयशंकर यावेळी  म्हणाले.

दरम्यान, त्यांनी  काल जोहान्सबर्गमध्ये रशियाचे परराष्ट्र मंत्री सेर्गेई लावरोव यांची भेट घेतली. यावेळी त्यांनी भारत-रशिया द्विपक्षीय सहकार्याच्या प्रगतीचा आढावा घेतला.तसंच युक्रेन संघर्षाशी संबंधित घडामोडींवरही चर्चा केली. डॉक्टर एस.जयशंकर यांनी दक्षिण आफ्रिकेचे अध्यक्ष सिरिल रामाफोसा यांचीही भेट घेतली आणि  दक्षिण आफ्रिकेच्या G20 प्राधान्यक्रमांसाठी भारताच्या पाठिंब्याचं आश्वासनही  दिलं.

**<u>काशपटेल</u>**

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांचे सहकारी आणि मुळ भारतीय वंशाचे असलेले काश पटेल यांची फेडरल ब्युरो ऑफ इन्व्हेस्टिगेशन अर्थात FBI च्या संचालक पदी नियुक्ती करण्यास सिनेटनं काल मान्यता दिली. 51-49 अशा अटीतटीच्या फरकानं काश पटेल यांना मतदान  झालं.

**<u>गोयल-ऑरिक</u>**

जगात विविध देशांदरम्यान सुरू असलेल्या संघर्षाच्या पार्श्वभूमीवर शाश्वत विकासाची उद्दिष्ट गाठणं आव्हानात्मक बनलं असल्याचं प्रतिपादन केंद्रीय मंत्री पियूष गोयल यांनी काल पुण्यात केलं.

परराष्ट्र मंत्रालय आणि पुणे इंटरनॅशनल सेंटर यांनी संयुक्तपणे आयोजित केलेल्या सहाव्या एशिया इकॉनॉमिक डायलॉग या वार्षिक परिषदेच्या उद्घाटन समारंभात ते बोलत होते. जोपर्यंत देशात वीज, पाणी आणि रस्ते यासारख्या पायाभूत सुविधा उपलब्ध करून दिल्या जात नाहीत, तो पर्यंत विकासाची कल्पना करता येत नाही. गेल्या 11 वर्षात या पायाभूत सुविधांच्या बाबतीत  सरकारने भरीव कामगिरी केल्याचं गोयल यांनी नमूद केलं.

**<u>रेल्वेमहाकुंभ</u>**

प्रयागराजमध्ये सुरू असलेल्या महाकुंभमेळ्याच्या शेवटच्या आठवड्यात, प्रवासी वाहतुकीत झालेली वाढ नियंत्रित करण्यासाठी भारतीय रेल्वे सज्ज झाली आहे. प्रवाशांच्या गर्दीवर नियंत्रण ठेवण्यासाठी आणि गर्दी टाळण्यासाठी रेल्वेनं स्थानकाच्या बाहेर अतिरिक्त  विशेष व्यवस्था तयार केली  आहे. प्रवाशांना त्यांच्या गाड्यांच्या सुटण्याच्या नियोजित वेळेनुसार  स्थानकावर  प्रवेश दिला जात आहे. नवी दिल्ली रेल्वे स्थानकावर गेल्या शनिवारी झालेल्या चेंगराचेंगरीच्या घटनेनंतर, भारतीय रेल्वेनं अनेक कडक उपाययोजना लागू केल्या आहेत. अयोध्या, वाराणसी, गाझियाबाद, नवी दिल्ली आणि आनंद विहारसह महत्त्वाच्या स्थानकांवर प्रवाशांच्या सुरक्षेसाठी अतिरिक्त रेल्वे संरक्षण दलाचे जवान  तैनात करण्यात आले आहेत.

**<u>पिफ-प्रेसनोट-माधवी</u>**

२३व्या पुणे आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाची काल सांगता झाली. या महोत्सवात जागतिक चित्रपट स्पर्धेमध्ये हाल्फदान उलमन तोंडेल यांनी दिग्दर्शित केलेल्या नॉर्वेच्या ‘आरमंड’ या चित्रपटाला उत्कृष्ट चित्रपटाचं महाराष्ट्र शासनाचं ‘प्रभात’ पारितोषिक मिळालं; तर संत तुकाराम उत्कृष्ट आंतरराष्ट्रीय मराठी चित्रपटाचं पारितोषिक रावबा गजमल यांनी दिग्दर्शित केलेल्या ‘सांगळा’ या चित्रपटाला मिळालं. मराठी चित्रपट महामंडळाचा सर्वोत्कृष्ट चित्रपट दिग्दर्शकाचा पुरस्कार;स्नो फ्लॉवर या चित्रपटासाठी गजेंद्र अहिरे यांना, सर्वोत्कृष्ट अभिनेत्याचा पुरस्कार अनिल दाभाडे यांना, तर सर्वोत्कृष्ट अभिनेत्री पुरस्कार छाया कदम यांना जाहीर करण्यात आला.

**<u>महाकुंभकारागृह</u>**

उत्तर प्रदेशातल्या विविध कारागृहांमध्ये असलेल्या कैद्यांना आज त्यांच्या कारागृहाच्या आवारातच प्रयागराज महाकुंभाचं पवित्र स्नान करण्याची संधी उपलब्ध होणार आहे. उत्तर प्रदेश सरकारच्या या उपक्रमा अंतर्गत, प्रयागराजमधल्या त्रिवेणी संगमाचं पवित्र पाणी कारागृहाच्या आवारात आणलं जाईल. इच्छूक कैद्यांना त्यांच्या धार्मिक श्रद्धेनुसार या पाण्याने स्नान आणि पूजा करता येईल. सध्या उत्तर प्रदेशच्या तुरुंगात एकंदर ९० हजार कैदी आहेत.

हॉकी पूल माधुरी

एफ आय एच हॉकी प्रो लीगमध्ये भारतीय महिला संघाचा सामना आज जर्मनीबरोबर  भुवनेश्वर मधल्या कलिंगा हॉकी मैदानावर होणार आहे. हा सामना संध्याकाळी सव्वापाच वाजता सुरू होणार आहे. या स्पर्धेत सलीमा टेटेच्या नेतृत्वातील भारतीय संघ गुणतालिकेत आठव्या स्थानावर आहे.भारतीय पुरुष संघाचा सामना याच मैदानावर आयर्लंडशी होणार आहे.हरमनप्रीत सिंगच्या नेतृत्वाखालील संघ ४ सामन्यांतून ६ गुणांसह गुणतालिकेत सातव्या स्थानावर आहे.

**<u>क्रिकेट आयसीसी</u>**

चॅम्पियन्स करंडक क्रिकेट स्पर्धेत काल भारतानं बांगलादेशवर 6 गडी राखून  मात करत या स्पर्धेत विजयी सलामी दिली. बांगलादेशच्या संघानं प्रथम फलंदाजी करत भारतापुढे २२९  धावांचं आव्हान ठेवलं; त्याला प्रत्युत्तर देताना ४७व्या षटकातच भारतीय संघानं विजय साकार केला. शुभमन गिलनं शतकी खेळी केली. त्याला सामनावीर पुरस्कारानं  सन्मानित करण्यात आलं. रोहित शर्मानं 41 तर विराट कोहलीनं 22 धावा काढल्या.

आज पाकिस्तानच्या कराची इथल्या मैदानावर अफगाणिस्तान आणि दक्षिण आफ्रिका यांच्यात 'ब' गटातील सामना होणार आहे.

## याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं नमस्कार